
# कोथळीगड

## चंद्रशेखर सावंत







ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# कोथळीगड

(दुर्गदर्शन)

## लेखक : चंद्रशेखर सावंत

# कोथळीगड

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# कोथळीगड

लेखक : चंद्रशेखर सावंत

शिवकोकण-ऐक्यवर्धक सहकारी गृहनिर्माण संस्था, ए-९०२, ए-विंग, ए-१, ९ वा मजला,

वेस्टर्न एक्सप्रेस हायवे च्या जवळ, शांताराम तलाव,

मालाड (पूर्व), मुंबई : ४०० ०९७

भ्रमणध्वनी : +९१ ९९३०५६०४५८

ब्लॉग : cnsawant.blogspot.in

ईमेल : shekharsawant1111@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन महाराष्ट्रदिन : १ मे २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अर्पण पत्रिका

*निर्विवाद सिंहपुरूष व ज्यांचे नाव कानावर येताच*
*छाती अभिमानाने फुलवणाऱ्या*
*हिंदवी स्वराज्य संस्थापक*
*छत्रपती शिवाजी महाराज*
*यांच्या चरणी कृतज्ञतापुर्वक अर्पण.*

*--/ चंद्रशेखर सावंत*

# !!आभार!!

*सर्वप्रथम 'ई-साहित्य प्रतिष्ठान' या संपूर्ण समूहाचे मनापासून आभार मानतो. त्यांनी मराठी लेखक व वाचक यांना त्यांची असलेली वाचनाची व लिखाणाची आवड वृद्धिंगत होत जावी यासाठी तसेच आजकालच्या इंटरनेट च्या युगात ई-पुस्तक स्वरूपात पुस्तके निर्माण करण्याचे फार मोलाचे व मोठे सत्कार्य त्यांच्याकडून सुरु आहे. याचा मला फार आनंद वाटतो व मनापासून अभिमान आहे.*


*ई-साहित्य प्रतिष्ठान च्या संकेतस्थळावर माझे 'किल्ले सोंडाई' व 'किल्ले कर्नाळा' हे ई-पुस्तक प्रकाशित झाले, याचा मला फार आनंद आहे. मराठ्यांचे शस्त्रागार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कर्जत येथील कोथळीगडावर माझा अनुभव मी तुमच्याशी ई-पुस्तक च्या माध्यमातून व्यक्त करत आहे. आशा बाळगतो की फार आनंदाने याचे स्वीकार कराल. तत्पूर्वी मी केलेल्या गडांवर गिर्यारोहणाचे अनुभवाचे लेखन, मी माझ्या ब्लॉग वर केले आहे. ई-साहित्य प्रतिष्ठान मुळे मी दुर्गदर्शन किंवा दुर्ग दुर्घट भारी या विषयाशी जोडला गेलो.*


*संपूर्ण ई-साहित्य प्रतिष्ठान चे मन:पासून आभार व असंख्य शुभेच्छा!*

*आपलाच,*
*--/ चंद्रशेखर सावंत*
*मालाड, मुंबई : ४०० ०९७*

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/karnala_chandrashekhar_sawant.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sondai_chandrashekhar_sawant.pdf



## स्वपरिचय

*संपूर्ण नाव: चंद्रशेखर नम्रता नथुराम सावंत*

*टोपण नाव : शेखर किंवा विकी*

*गाव : मु.पो. नांदवी, जिल्हा: रायगड - ४०२ १०३*

*राहण्याचा पत्ता: शिवकोकण-ऐक्यवर्धक सहकारी गृहनिर्माण संस्था,*

*ए-१, ए-१०२, १ वा मजला, पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या जवळ,*

*शांताराम तलाव, मालाड (पूर्व), मुंबई : ४०० ०९७*

*भ्रमणध्वनी: +९१ ९९३० ५६ ०४५८*

*ब्लॉग: cnsawant.blogspot.in*

*ई-मेल: shekharsawant1111@gmail.com*

*छंद: ट्रेकिंग, ट्रॅव्हल आणि लिखाण*

# मराठ्यांचे शस्त्रागार - किल्ले कोथळीगड

*साल २०२० ला सुरुवात झाल्यापासून, सदैव आयुष्य जगायला प्रेरित करणाऱ्या सह्याद्रीच्या समोर स्वतःला नतमस्तक करवून देण्याचा योगच येत नव्हता. संपूर्ण जानेवारी महिना गेला पण काय कुठे जायला जमतच नव्हते. पण फेब्रुवारी मध्ये पहिल्याच हप्त्यात निघायचे आहे, ह्याची लगबग जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात व्हायला सुरुवात झालेली. सुरू झालेल्या नवीन वर्षात सह्याद्रीच्या कुशीत माझे इतर मित्र गिर्यारोहण करण्यासाठी बऱ्याच ठिकाणी निघत होते. ह्या सर्वात त्यांच आमंत्रण येऊन सुद्धा मलाच शक्य होत नव्हते. ह्यात मनोज मला २-३ महिन्या अगोदरच बोललेला. कुठे सह्याद्री सफर करायला निघालास तर कळव. एके दिवशी अचानक माझ्या मनामध्ये कर्जत येथे असणाऱ्या कोथळी गडाविषयी विचार आला, मुंबई मध्ये चाललेल्या धावपळी मुळे सतत २-३ दिवस कोणत्या गिर्यारोहणासाठी जाणं म्हणजे असंभव होऊन जातं. एका दिवसात जाऊन येण्यामध्ये तो एक गड सर करण्याचा आमचा बाकी होता.*

*मनोज आणि अंकित या दोघांना फोनद्वारे कळवून ठेवले आणि आमचे २ फेब्रुवारीला जायचे ठरले. ठरल्या प्रमाणे व्हॉट्सॲप वर ग्रुप बनवला आणि कोथळी गडाविषयी मिळेल ती माहिती शोधून आम्ही ग्रुप मध्ये टाकण्यास सुरुवात केली. तिथे पोहोचण्याच्या वाटा, किल्ल्याचा इतिहास, जेवणाची सोय इत्या. अश्याप्रकारे माहिती व्हॉट्सॲप ग्रुप मध्ये पाठवत होतो. मनोज आणि अंकित तयार होताच ते दोघेही मला म्हणाले कधी निघायचं तेवढं फक्त सांग. ठरल्याप्रमाणे पहाटे सकाळी ०३.४५ ला आम्ही (मनोज व मी) घरातून निघालो. मनोज व मी एकाच सोसायटीत एकाच मजल्यावर राहत असल्यामुळे आमची सकाळी निघताना भेट लगेच झाली. मनोज माझ्या अगोदरच खाली तळ मजल्यावर गेलेला. खरंतर मलाच ५ मिनिट उशीर झालेला. पण आम्ही भेटल्यावर एक वेगळ्या प्रकारचं समाधान आम्हाला मिळालं. एकाच मजल्यावर राहत असल्यामुळे कधी भेट झाली तर होतच असते पण ट्रेकसाठी जायचं म्हटल्यावर सकाळी पहाटे होणारी भेट ही खरोखरच विशेष होती. मालाड स्टेशनला रिक्षातून उतरताच मनोजच्या सॅक मधली इलेक्ट्रल पाण्याची बाटली पडून पाणी त्यातून बाहेर सांडले गेले. म्हणजे भूमी मातेकडून मिळालेला शुभसंकेत म्हणावा लागेल नाही का.. म्हणजे चहावाले जसे सकाळी धरतीमातेला प्रसन्न करण्यासाठी एक चहाचा व एक पाण्याचा कप देऊन नमस्कार करतात तसेच आम्ही सह्याद्री सफर करायला निघालो म्हणून धरतीमातेने तिझे कार्य स्वतःच करून घेतले की काय, असे वाटू लागले. पुढे जरा तिथे गेल्यावर थोड्याच वेळात अंकित आला. अंकित माझा शाळेतील वर्गमित्र. सह्याद्रीतील भटकंतीच्या निमित्ताने त्याची व माझी होणारी भेट ही फार आनंदाची होती. आम्ही मालाड हून लोकलट्रेन ने दादर ला निघालो. सेंट्रल लाईन च्या दादर वरून प्लॅटफॉर्म क्रमांक ०१ वरून ०५.३८ ची कर्जत ला जाणारी ट्रेन आम्हाला मिळाली व त्यात सुदैवाने बसायला जागा सुद्धा मिळाली. गप्पा गोष्टी करत एक मेकांचे अनुभव शेअर करत बदलापूर पर्यंत आम्ही पोहोचलो कधी हे आम्हाला कळले सुद्धा नाही. ट्रेन मध्येच एक इडली मेदूवडा घेऊन आलेला अण्णा दिसला. विचार केला की आपण ट्रेन मध्येच नाष्टा करून घ्यायचा, म्हणजे पुढचा न्याहरीचा वेळ वाचेल.*

*ट्रेन मध्ये न्याहरी करण्याची ती माझी पहिली वेळ व सोबत गिर्यारोहण करणारे मित्र असल्यामुळे पूर्ण एकदम झकास वाटत होतं.*



***मी, अंकित व मनोज***



***महाराष्ट्राच्या लाडक्या लालपरी सोबत***





***लालपरीची साथ***

*कर्जत येताच आम्ही कर्जत एस.टी. स्थानकाच्या इथे पोहोचलो तिथून आंबिवली या गावी जाणारी बस ८.३० वाजता निघणार होती. तर मग काही वेळ होता आमच्याकडे. महाराष्ट्राची लाडकी लालपरी म्हणून ओळख असणाऱ्या बसबरोबर, आवडीने तिच्याबरोबर मनोज च्या फोन मध्ये काही फोटो काढून घेतले व आमच्या गप्पागोष्टी तर चालूच होत्या. बस सुटण्याची वेळ होताच बस मध्ये आम्ही लगेच आसनस्थही झालो. पण आम्ही बसमध्ये पुरेपूर आराम केला. कारण आराम न केल्यामुळे नंतर जाणवणारा थकवा जर का आला, तर तो आम्हाला सहन करायचा नव्हता म्हणून सुरवातीलाच लालपरी मध्ये आराम करून घेतला. १० च्या आसपास आम्ही आंबिवली या गावात आलो. मित्र-मैत्रिणींनो ट्रेक साठी मिळणारे मनापासून दुसरे समाधान म्हणजे गड पायथ्याशी असलेल्या गावी पोहोचणे व पाहिले समाधान म्हणजे घरातून गिर्यारोहणासाठी निघणे. आंबिवली हे गाव गडाच्या पायथ्याशी नसून थोड्या काही अंतरावर*

*आहे. पण आम्हाला बसने तिथपर्यंत सोडलं त्यासाठीच, कारण पुढचा प्रवास आमचा हा पायी होता. आंबिवली या गावी उतरल्यानंतर झालेला आनंद हा एक सकारात्मक विचार व ऊर्जा देणारा होता. आंबिवली या गावी उतरताच हॉटेल कोथळा गड हे नजरेस पडते. आंबिवली हे गाव गडाच्या पायथ्या पासून ३ किमी वर असलेलं गाव आहे.*




***सह्याद्री प्रतिष्ठान कडून लावण्यात आलेले दिशादर्शक***

*आंबिवली गावापासून पेठ या गावापर्यंत जाण्यासाठी वाट रुळलेली आहे. उन्हाच्या थोड्याफार वेदना ह्या होतंच होत्या म्हणून पेठ या गावापर्यंत जाण्यासाठी आमच्या मनात विचार चालू होते ते म्हणजे पावसाळ्यात हा परिसर कसा दिसत असेल? कुठून झरे व धबधबे वाहत असतील? असं सर्व मनात येत होते. आम्ही असे समजूनच मार्गस्थ होत होतो. सकाळी ११.२० च्या आसपास आम्हाला एक विस्तृत ठिकाणी विसावा घेण्यासाठी एक झाड सुद्धा नजरेस पडले. सॅक बाजूला ठेऊन ५-१० मिनिटे जरा शरीराला आराम करू दिला. तेथूनच दिसणारा कोथळी गडाचा तासलेला सुळका जणू आमचीच वाट पाहतो आहे असे भासवत होता. म्हणून आम्ही पुढे जाण्यास लगेच तयार झालो. पुढे निघताच काही मिनिटांनी पेठ हे गाव लागते. पेठ या गावी पोहोचताच भैरवनाथ भोजनालय लागते. जेवणाची ऑर्डर*

*वैगरे द्यायची असली का तुम्ही अगोदर तसं सांगून पुढे गड चढाई साठी निघू शकता. पेठ हेच खरे किल्ल्याच्या पायथ्याचे गाव. या गावात पोहोचताच. मारुतीरायाचे सुंदर मंदिर दिसले. मारुतीचे दर्शन करताच मारुतीच्या मंदिरा समोर असलेल्या अंगणामध्ये एक छोट्या तोफेचे दर्शन झाले. तिथे थोडे थांबून पाण्याच्या बाटली मध्ये इलेक्ट्रल पावडर टाकून घेतली कारण पुढचा प्रवास हा मुख्य व गडचढाईचा होता. गडाच्या पायथ्याशी पोहोचताच आम्हाला एक यु.एस.ए वरून आलेले जोडपं भेटले. त्यांच्याशी ओळख ही अगदी बिनधास्त व दिलखुलास झाली. सोबत त्यांची मैत्री गडाच्या माथ्यापर्यंत होती. त्यांचे असलेले ट्रेक संबंधित अनुभव व आमचे अनुभव आम्ही एकमेकांस दिलखुलास गप्पा मारून व्यक्त करत होतो. आपल्या छत्रपती शिवप्रभूंच्या इतिहासात असलेल्या प्रत्येक गडांचे आकर्षण ह्या बाहेरगावच्या माणसांना सुद्धा आहे. ह्याचा मनापासून फार मोठा अभिमान वाटून याचा आनंद गगनात मावेनासा होतो.*



***किल्ल्याच्या पायथ्याशी लावण्यात आलेल्या सूचनाफलक***

***सोबत आमचं त्रिकुट***




## *कोथळीगडावर ठेवण्यात आलेल्या तोफा*

*११.५० च्या आसपास आम्हाला दिसून येत होतं की आपण जवळपास किल्ल्याच्या तटबंदी पर्यंत आपण पोहोचलो. कोथळी गड हा कर्जत च्या ईशान्य दिशेला साधारण २१ किलोमीटर अंतरावर आहे. किल्ल्याच्या ठिकाणी प्रवेश करताच २ तोफेचे व समोर असलेल्या बुरुजाचे तिथे दर्शन होते. तिथे थोडी विश्रांती व पुढे हिंदवी स्वराज्याचे प्रतीक असलेल्या भगव्या झेंड्याबरोबर फोटो काढून घेतले व त्यातच गडावर पोहोचल्याचे समाधान. डाव्या बाजूने पुढे मार्गस्थ होत असतानाच उजव्या बाजूला थोड्या वरच्या दिशेला श्री गणेशाचे दर्शन होते. तेथे बाजूलाच पाण्याच्या साठ्याचे तळे आहेत. समोरच पुढे चालत गेलात तर एका देवीचे मंदिर लागत असून त्याच्याच पुढे भैरोबाची गुहा आहे. भैरोबाच्या कातळाच्या पोटात खोदलेली गुहा हे ह्या गडावरचे खास आकर्षण. प्रथम आहे ती देवीची गुहा, पाण्याचं टाके आणि मग डावीकडे ऐसपैस अशी भैरोबाची गुहा. या गुहेचे वैशिष्ट्य म्हणजे सपाट जमीन आणि छताला आधार देणारे कोरीव नक्षीदार खांब. गुहेत काही ठिकाणी ४०-४२ तरी गोल खळगे आहेत याचं कारण मात्र अद्यापही मला समजलेलं नाही, गुहेच्या आत २ खोल्या आहेत. ज्यांच्या प्रवेशद्वारावर नक्षीदार कला पहावयास मिळते. त्याचबरोबर गुहेत काही तोफेचे गोळे आहेत.*




*गडावरील श्री गणेशाचे दर्शन*




*कोथळीगडावरील देवीची गुहा*




*भैरोबाच्या गुहेतील नक्षीदार खांब व आतील खोलीचे प्रवेशद्वार*

गुहेजवळच एका ऊर्ध्वमुखी भुयारात किल्ल्याच्या सुळक्यावर जाण्याचा मार्ग आहे. ‘कोथळीगड’ या नावाची उत्पत्ती ‘कोथळा’ या शब्दात आहे. हे कागदपत्रांतून समजते. गडाच्या सुळक्यामध्ये दुर्गस्थापत्याची अशी कला दडली आहे की महाराष्ट्रात अशा प्रकारची रचना फार फार तर क्वचित एखाद्या गडावर पाहायला मिळेल. हा किल्ला ‘कोथळा’ या नावानेही ओळखतात व पेठ या गावामध्ये असल्यामुळे पेठचा किल्ला असेही म्हणतात. ह्या गडाची चढाई श्रेणी सोप्पी असून, पायथ्यापासून होणाऱ्या गुहेची सुरुवात मोठी आहे. गुहेचे खांब मूळ पाषाणातून कोरून काढले असून गुहेतून एक कोरून काढलेला दगडी जिना किल्ल्याच्या माथ्यावर जातो. थोडी कठीण चढाई करून किल्ल्याच्या माथ्यावर पोचता येते. वर जागा अगदी थोड्या प्रमाणात असून हा किल्ला ज्या डोंगरावर आहे तो कर्जतच्या मूळ डोंगररांगेपासून तुटून वेगळा पडलेला आहे. संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत या किल्ल्याला फार महत्त्व होते. शिवाजी महाराजांच्या काळात या किल्ल्याचा उपयोग शस्त्रास्त्रांचा साठा ठेवण्यास करत असत.



**भुयारातून चढाई करताना मनोज व मी**

मुख्य सह्याद्री रांगेपासून विलग झालेल्या डोंगरावर उभा असलेला एक सुळका असे ह्याचे रूप आहे. या किल्ल्याची बाजारपेठ या गडाच्या पठारावर होती त्यामुळे या पठारावर असलेल्या गावाचे नावही पेठ व गडालासुद्धा पेठचा किल्ला असे सुद्धा म्हणतात. पायथ्याजवळच्या पेठ गावातून चहुबाजूंनी तासल्यासारखा पेठचा सुळका दिसतो. या गावाहून वर गडावर चढण्याचा मार्ग दमछाक करणारा आहे. ही वाट सरळ किल्ल्याच्या प्रवेशद्वाराशी घेऊन जाते. पायवाटेने वर पोहोचल्यावर पायऱ्याचे व नवीन प्रवेशद्वाराचे दर्शन होते. वरच्या सुळक्याचा चढ थोडाफार कठीण आहे व चारही बाजूंनी कातळकडे उघडे पडले आहेत. कोथळी गडावर दुर्गवास्तुशास्त्राची अक्षरश: उधळण आहे असं म्हटलं तरी काय हरकत नाही. गडाचा परिसर मुळात कमी प्रमाणात असल्याने गडावर बांधकामे फारशी नाहीत. पण कोथळीगडाच्या मुख्य गुहेपासून गडाच्या माथ्यावर जाताना गडाचा सुळका अक्षरश: कुतुबमिनार सारखा आतल्या बाजूने खोदून काढलेला असून, त्याचा कोथळा काढण्यात आलेला आहे आणि म्हणूनच किल्ल्याचे नाव कोथळीगड आहे की काय असे समजते. या मार्गामध्ये बोगद्यासारखी रचना तयार करण्यात आलेली असून किल्ल्याच्या माथ्याकडे जाण्यासाठी या सुळक्याच्या आतल्या बाजूने भक्कम पायऱ्या कोरलेल्या आहेत. किल्ल्याचा हा मार्गही सरळ नसून वळणं घेत आपण या भुयारातून गडाच्या वरच्या बाजुस बाहेर पडतो. कोथळीगडाच्या मुख्य बालेकिल्ल्याचा प्रवेश रोखण्याच्या उद्देशाने ही बांधणी केलेली आहे. कारण पुढील मार्गही अरुंद असून खोदीव पायऱ्या पार केल्यावरच गडाचा दरवाजा समोर येतो. पायऱ्याच्या मार्गावर उजवीकडे गज शिल्प कोरलेले आहे. पायऱ्याच्या शेवटी दरवाजा आहे. दरवाजावर शरभ शिल्प कोरलेले आहे. संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत या किल्ल्याला फार महत्त्व होते.




**गडावरील पाण्याचे तळे**




*निसर्गाच्या दुनियेत अंकित व मी*




**स्वराज्याचे प्रवेशद्वार**




*प्रवेशद्वाराशी असलेले शरभ शिल्प*




*प्रवेशद्वाराशी असलेले गज शिल्प*




कातळात कोरलेल्या पायऱ्या




गडाच्या कुशीतून निसर्गाचा आस्वाद घेताना




वर जाण्यासाठी असलेले भुयार




*गडाच्या लेण्यांवरच्या प्रवेशद्वाराशी असलेले सुंदर नक्षीकाम*




गडावरील सुळक्याच्या पायथ्याशी असलेले तळे







***ह्यातले समाधान वेगळेच***

छोट्याश्या असणाऱ्या या किल्ल्याचा इतिहास मोठा रक्तरंजित आहे. त्याविषयाची माहिती मराठी व इंग्रजी कागदपत्रातून नव्हे तर मोगली कागदपत्रांमधून मिळते. हा किल्ला काही बलाढ्य दुर्ग नाही, पण एक संरक्षक ठाण होता. मराठ्यांचे या किल्ल्यावर शस्त्रागार होते. शिवाजी महाराजांच्या काळात या किल्ल्याचा उपयोग शस्त्रास्त्रांचा साठा ठेवण्यास करत असत. शिवाजी महाराजांनंतर जेव्हा औरंगजेबने ह्या भागात आक्रमण केले तेव्हा हा किल्ला मराठ्यांकडेच होता. संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत या किल्ल्याला फार महत्त्व होते. औरंगजेबाने १६८४ मध्ये अब्दुल कादर याला संभाजीराजाच्या ताब्यातील या भागातील किल्ले घेण्यासाठी पाठवले. कोथळी गड हा महत्त्वाचा असून जो कोणी तो ताब्यात घेईल, त्याचा ताबा तळकोकणावर राहील हे लक्षात घेऊन अब्दुल कादर याने हा किल्ला घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले. तो या किल्ल्याच्या जवळपास गेला आणि तेथे राहणाऱ्या लोकांना त्याने आपले नोकर म्हणून ठेवून घेतले. मराठे या किल्ल्यातून शस्त्रांची ने-आण करतात हे कळताच अब्दुल कादर व त्याचे सैन्य गडाच्या पायथ्याशी पोहोचले. नारोजी त्रिंबक हा गडाचा किल्लेदार रसद व दारुगोळा मिळविण्याकरिता बाहेर गेला होता व गडाचा ताबा माणकोजी पांढरे ह्याच्याकडे होता. शिवकाळात स्वराज्याचा मुन्शी असणारा काझी हैदर संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत औरंगजेबाला फितूर झाला असून त्याने माणकोजी पांढरे यांना फितूर केले आणि रात्रीच्या काळोखात माणकोजी पांढरे यांनी अब्दूल कादर व त्याच्या सैन्याला हे आपलेच लोक रसद घेवून आले आहेत असे सांगून गडात प्रवेश दिला आणि त्यांनी गडावरचं सैन्य कापून काढले. दुसऱ्याच दिवशी मराठ्यांनी किल्ल्याला वेढा घातला, फार मोठी लढाई झाली. या लढाईत शस्त्रांचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला. या लढाईत किल्ल्यावरचा दारूगोळा आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. गडावर जाणारी सामग्री मराठ्यांनी लुटल्यामुळे मुघल सैन्याला दारूगोळा व धान्य मिळेनासे झाले. अश्यावेळी अब्दुल कादरच्या मदतीला कोणीच न आल्यामुळे त्याची परिस्थिती कठीण झाली. पुन्हा वेढा टाकल्यानंतर दहा बारा दिवसांनी जुन्नरचा किल्लेदार अब्दुल अजिजखान याने आपला मुलगा अब्दुलखान याला सैन्यासह अब्दुल कादरच्या मदतीला पाठवले. अब्दुलखान तेथे पोहचला तेव्हा त्याची वाट अडवण्यासाठी मराठ्यांचा सरदार नारोजी त्रिंबक यांनी तेथील खोरे रोखून धरले होते. येथेही लढाई झाली नारोजी त्रिंबक व इतर सरदार धारातीर्थी पडले आणि कोथळागड मुघलांच्या ताब्यात गेला. इद्दतममखान ह्या मुघल सरदाराने त्याच्या पार्थिवाचे तुकडे केले आणि नारोजी त्रिंबकाचे डोके रस्त्यावर टांगले. किल्ला जिंकून सोन्याची किल्ली औरंगजेबाकडे पाठवण्यात आली. औरंगजेबाने कोथळागड नावाचा असा कोणता गड अस्तित्वात आहे का? याची खात्री करून मगच अब्दुल कादरला बक्षिसे दिली. मुघलांनी गडाला मिफ्ताहुलफतह म्हणजेच विजयाची किल्ली असे नाव दिले. फितूर झालेल्या काझी हैदरला ७०,००० रुपये बक्षीस देण्यात आले. दुर्दैवाने मराठ्याच्या हातून हा मोक्याचा किल्ला निसटला. गड परत मिळवण्यासाठी मराठ्यांनी प्रयत्न सुरू केले. डिसेंबर १६८४ मध्ये गडाकडे जाणाऱ्या मुघल सैन्याला मराठ्यांनी अडवले. नंतर मऱ्हामतखानालाही मराठ्यांच्या तुकडीने अडवले. पण मराठ्यांना यश लाभले नाही. त्यानंतर एप्रिल १६८५ मध्ये सैन्यांच्या तुकडीने पुन्हा हल्ला केला. सैन्य दोरीच्या शिडीच्या मदतीने किल्ल्यात उतरले. युद्ध होऊन बरेच रक्त सांडले. अर्थातच मराठ्यांनी हा महत्त्वाचा किल्ला गमावला होता. पुढे १८१७ मध्ये दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या

*वतीने बापुराव नामक शूर सरदाराने हा किल्ला इंग्रजांच्या ताब्यातून सोडवला. सुमारे १८६२ पर्यंत किल्ल्यावर माणसांचा राबता होता.*

*कर्जतहून खेड - कडूसकडे जाणाऱ्या कोलिंबा आणि सावळ घाटावर लक्ष ठेवण्यासाठी या किल्ल्याचा उपयोग होत असे. गडमाथ्यावर पाण्याची दोन टाकी आहेत. गडमाथ्यावरुन भीमाशंकरकडील कलावंतिणीचा महाल, नागफणी, सिद्धगड, कल्याणकडील हाजीमलंग, चंदेरी, प्रबळगड, नागफणी, इर्शाळगड, माणिकगड, माथेरानचे पठार हा विस्तृत मुलूख नजरेस येतो. गडमाथ्यावरुन परत गुहेजवळ येउन सुळक्याला प्रदक्षिणा घातलताना वाटेत पाण्याच्या टाक्यांचे दोन समुह व एक लेण पाहायला मिळते. किल्ल्याचा आटोपशीर विस्तार लक्षात घेऊन पाण्याच्या टाक्यांची व्यवस्थाही नेटकेपणाने केलेली आहे. गडाच्या अर्ध्या भागावरील गुहेच्या बाहेर, सर्वोच्च माथ्यावर व किल्ल्याच्या सुळक्याच्या पोटात पाण्याची टाकी खोदलेली आहेत.*

*गडावर तुम्ही गड प्रदक्षिणा करू शकता, पण कोणी व्यवस्थित सल्लागार असल्याशिवाय त्या वाटेला जाऊ नका आणि पावसाळ्यात तर नकोच. मी, मनोज आणि अंकित आम्ही तिघांनी ही प्रदक्षिणा पूर्ण केली ती मनोज ने दिलेल्या धैर्य व आत्मविश्वासामुळेच. सुळक्याला प्रदक्षिणा घालून झाल्यावर एक विशिष्ट प्रकारचं समाधान वाटले. पुढे आम्ही परतीच्या दिशेला परतलो व रात्री ०८.३० च्या सुमारास आम्ही राहत्या घरी आलो. अश्याप्रकरे कोथळी गडाचा प्रवास सदैव आठवणीत राहणारा असेल. या प्रवासात साथ देणारे माझे मित्र अंकित व मनोज यांना सुद्धा माझा नमस्कार.*



# *कोथळी गडावरील पाहण्यासारखी ठिकाणे*

*सुळका (कोथळी गड) :*

*कोथळी गडाच्या पायथ्याशी असलेल्या पेठ गावातून वर मान करून बसलेल्या कासवासारखा हा सुळका दिसतो. या सुळक्याच्या दिशेने जात असताना परिसरातील आकर्षक करणारे मनमोकळे वातावरण, थंडगार वारा याचा अनुभव घेता येतो जसे काय आयुष्य नवीन जगायला मिळालेली संजीवनीच.*

*कोथळी गडाचा पायथा :*

*गडाच्या पायथ्याशी कातळात कोरलेल्या गुहा आहेत. या गुहेमधुनच कोरलेल्या पायऱ्यांची वाट गडावर जाते. पायवाटेने वर पोहोचल्यावर पायऱ्यांचे आणि प्रवेशद्वाराचे अवशेष दिसतात. पायथ्याशी असलेल्या आणि छताला आधार देणाऱ्या खांबांवर नक्षीकाम करण्यात आले आहे.*

*देवीची गुहा :*

*गडाच्या खाली पायथ्याशी देवीची गुहा आहे. या गुहेमध्ये एक मूर्ती आहे. तसेच या गुहेमध्ये देखील नक्षीकाम करण्यात आलेले आहे. या गुहेमध्ये मूर्तीच्या समोर काही घंटा आहेत. येथे एक पाण्याचे टाके देखील आहे.*

*भैरोबाची गुहा :*

*या गुहेमध्ये गडाच्या खाली छताला आधार देणारे कोरीव नक्षीदार खांब आहेत. तसेच गुहेमध्ये तोफेचे गोळे देखील आहेत. गुहेमध्ये भैरोबाची मूर्ती आहे. या गुहेजवळच किल्ल्याच्या सुळक्यावर जाण्यासाठी पायऱ्या कोरलेल्या आहेत. पायऱ्यांच्या मार्गावर काही शिल्प कोरलेले आहे. पायऱ्यांच्या शेवटी गडावर पोचताच समोर दगडात कोरून काढलेला एक दरवाजा असून आत्ता सह्याद्री प्रतिष्ठान च्या गड किल्ले संवर्धकांनी स्वराज्याचे प्रवेशद्वार बसवले आहे.*

*पाण्याची टाकी :*

*कोथळी गडाच्या माथ्यावर पोचल्यानंतर आपल्याला समोर दोन पाण्याची टाकी दिसतात. या टाक्यातील पाणी पिण्यासाठी वापरत नसून या पाण्याच्या टाक्यापासून पुढे जात असताना आपणास काही छोट्या तोफा ठेवलेल्या दिसतात. या तोफांपासून पुढे गेल्यानंतर गड माथ्यावरील सपाट प्रदेश दिसतो.*

*कोथळी गडाचा माथा :*

*गडमाथ्यावरुन भीमाशंकरकडील कलावंतिणीचा महाल, नागफणी, सिद्धगड, कल्याणकडील हाजीमलंग, चंदेरी, प्रबळगड, नागफणी, इर्शाळगड, माणिकगड, माथेरानचे पठार हा विस्तृत मुलूख नजरेस येतो. हा अनुभव खूपच मानसिक समाधान देणारा आहे.*

*सुळक्या वर जाण्यासाठी भुयारी मार्गात कोरलेल्या पायऱ्या :-*

*कोथळी गडावर जाण्यासाठी कोरलेल्या पायऱ्या आणि परिसरातील निसर्ग सौंदर्य आज ही आपणास आपल्या पुर्वजांच्या इतिहासाची साक्ष देते. त्यामुळे दुर्ग भ्रमंती करणाऱ्या किंवा सह्याद्रीतील निसर्ग अनुभवण्यासाठी दुर्ग प्रेमींनी कोथळी गडावर एकदा तरी जावे.*

# पोहोचण्याच्या वाटा

*मुंबईहून लोहमार्ग :-  सकाळी दादर हून कर्जत ला जाणारी ट्रेन पकडावी. कर्जत एस.टी. स्थानकांमध्ये चौकशी करून आंबिवली या गावी उतरावे. आंबिवली ते पेठ हे अंतर ३ किलोमीटर आहे.*




*पुण्याहून लोहमार्ग :-  पुण्याहून सिंहगड एक्स्प्रेस ने कर्जत या स्थानकावर उतरावे. कर्जत एस. टी. स्थानकाच्या येथून कशेळे ला जाणारी बस पकडावी व आंबिवली या गावी उतरावे.*

*नेरळ ने यायचे झाल्यास कशेळे या गावी यावे व तिथून जामरुख ची एस. टी. पकडून आंबिवली या गावात यावे.*




*खाजगी वाहन असल्यास कर्जतला पाहिले पोहोचावे तिथून GPS ला फॉलो करत मार्गस्थ व्हावे अन्यथा परिसरातील व्यक्तींना विचारत गेलात तरी चालेल.*

*राहाण्याची सोय:  भैरोबाच्या गुहेत २० - २५ जण व्यवस्थित राहू शकतात.*

*जेवणाची सोय: जेवणाची सोय आपणच करावी. पेठ गावात 'कोथळागड' नावाचे हॉटेल आहे.*

*पाण्याची सोय : गडावर बारामाही पिण्याच्या पाण्याची टाकी आहेत.*

*जाण्यासाठी लागणारा वेळ : आंबिवली गावापासून २ तास लागतात, तर पेठ गावापासून १ तास लागतो.*


*किल्ल्याचा प्रकार :- गिरिदुर्ग*

*डोंगररांग :- कर्जत*

*जिल्हा :- रायगड*

*उंची :- ३१०० फूट*

*श्रेणी :- मध्यम*



# ऋणनिर्देश

*छायाचित्र :- मनोज सावंत*

*नकाशा :- bhatkantisahyadrichi.wordpress.com*

*किल्ल्याबद्दल पूर्व माहिती :- Google*

*प्रवास :- Auto Rickshaw, Local Train & MSRTC*

*पोहोचण्याच्या वाटा :- TreKshitiZ Sanstha*

दुर्ग दुर्घट भारी

आसेतूहिमाचल

सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण...

कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.
याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. वाटा आणि वळणांचा आनंद वाटत रहा.

आपल्या लेखनाची मेल पाठवा.

esahity@gmail.com